**INTERNATIONAL LEPROSY UNION-HEALTH ALLIANCE**

ILU-HA

C/o. CASP BHAVAN : Survey No. 132/2, Plot No. 3, Pashan Baner Link Road,
Pune 411 021. INDIA Tel. : 32317932
E-mail : ilupune@gmail.com Website : www.ilu.org.in

Hon. Justice **Chandrashekhar Dharmadhikari,** (Retd.) Patron | **Mr. Ram Naik** President | **Dr. S. D. Gokhale** Hon. President

**Mr. R. H. Belavadi** Vice - President | **Maj. Dr. Pradip Gaikwad** Ex-Director | **Dr. Dilip Satbhai** Hon. Treasurer | **Mrs. R. S. Gokhale** Hon. Secretary

**कृपया प्रसिद्धीसाठी** **21 डिसेंबर 2012**

## कुष्ठपीडितांवर अन्याय करणारे जुने कायदे बदलण्याचे

## केंद्रिय कायदा मंत्रालय सचिवांचे आश्वासन

**मुंबई, शुक्रवार:** कुष्ठपीडितांच्यावर सामाजिक अन्याय आणि भेदभाव करणारे सोळा कायदे बदलण्यासाठी ठोस पावले उचलण्याचे आश्वासन भारत सरकारच्या कायदा मंत्रालयाचे सचिव श्री. पी.के.मलहोत्रा यांनी आंतरराष्ट्रीय कुष्ठपीडित संघटनेच्या शिष्टमंडळाला गुरुवारी मुंबई येथे दिले. संघटनेचे अध्यक्ष आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या शिष्टमंडळात महाराष्ट्राचे निवृत्त कायदा मंत्रालयाचे मुख्य सचिव श्री. व्ही.के.देशपांडे, संघटनेचे उपाध्यक्ष आणि महाराष्ट्राचे निवृत्त कारागृह महासंचालक श्री. राम बेलवडी, संघटनेचे कार्यकारी संचालक आणि आरोग्य विभागाच्या कुष्ठ व क्षय खात्याचे निवृत्त संयुक्त संचालक मेजर डॉ. प्रदीप गायकवाड तसेच संघटनेचे कार्यक्रम अधिकारी श्री. संकेत चिपळूणकर यांच्या समावेश होता. ही माहिती संस्थेच्या प्रसिद्धी पत्रकात देण्यात आली आहे.

या विषयासंबंधी अधिक माहिती सांगताना श्री.राम नाईक म्हणाले,''कुष्ठपीडितांचे सशक्तीकरण करण्यासाठी देशातील कुष्ठपीडितांच्या क्षेत्रात काम करणा-या स्वयंसेवी संघटनांच्यावतीने राज्यसभेला 4 डिसेंबर 2007 रोजी 'विनंती अर्ज' सादर करण्यात आला होता. त्या अर्जाबाबत अभ्यास आणि चर्चा करुन तसेच देशातील काही कुष्ठपीडितांच्या वसाहतींना भेटी देऊन विनंती अर्ज समितीने 24 ऑक्टोबर 2008 मध्ये राज्यसभेला अहवाल सादर केला. त्या अहवालाच्या शिफारशीबद्दल विविध मंत्रालयाकडून झालेल्या कार्याबद्दलचा कृती अहवाल (ॲक्शन टेकन रिपोर्ट) 22 नोव्हेंबर 2010 रोजी राज्यसभेत सादर करण्यात आला. त्यानंतर शिफारशींवर प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी म्हणून पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांना संघटनेच्यावतीने चार पत्रे पाठविण्यात आली तर राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांची 14 सप्टेंबर 2011 आणि 15 जून 2012 रोजी प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा करण्यात आली. राष्ट्रपतींनी योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले परंतु केंद्र सरकारकडून प्रत्यक्ष कारवाईस सुरुवात झाली नाही.''



Registered under Bombay Public Trust Act 1950 : Registration No. F-4367 (Pune)
The Societies Registration Act, 1860 Registration No. Maharashtra/3301/1987/Pune

''कुष्ठपीडितांच्यावर पक्षपात करुन अन्याय करणारे सोळा कायदे असून त्यामध्ये सुधारणा करण्याची विनंती अर्जात करण्यात आली होती. पूर्वी कुष्ठरोग हा असाध्य आणि संसर्गजन्य समजला जात असल्यामुळे कुष्ठपीडितांना कुटुंबातून बाहेर टाकले जात असे. कुष्ठरोग झाल्यास त्या कारणावरुन घटस्फोट दिला जातो, रेल्वे आणि बस प्रवासावर प्रतिबंध आहेत, भिक मागण्यास प्रतिबंध करुन त्यांच्या मानवी हक्काची पायमल्ली होते, अपंग पुनर्वसन कायद्यातही त्यांना सुविधा मिळत नाहीत, वगैरे अनेक अडचणींना त्यांना तोंड द्यावे लागते. गेल्या काही वर्षात झालेल्या शास्त्रीय संशोधनामुळे आता कुष्ठरोग बरा होतो तसेच तो संसर्गजन्यही राहिला नाही. त्यामुळे जुने कायदे बदलण्याची गरज निर्माण झाली आहे. आमच्या संघटनेच्या शिष्टमंडळाने 10 डिसेंबर 2012 रोजी कायदा मंत्री श्री. अश्विनीकुमार यांच्याशी दिल्ली येथे चर्चा केली. त्यावेळी कायदा मंत्रालयाचे सचिव श्री.पी.के. मलहोत्रा उपस्थित होते. कायदा मंत्र्यानी या विषयात लक्ष घालण्याचे आश्वासन दिले. त्याप्रमाणे कायदा मंत्रालयाचे सचिव श्री. मलहोत्रा यांच्याशी मुंबई येथे गुरुवारी प्रत्येक कायद्यात सुधारणा करण्यासंबंधी सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती 16 कायद्यात सुधारणा करण्यासाठी ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली जाईल असे स्पष्ट आश्वासन श्री. मलहोत्रा यांनी दिले,'' अशीही माहिती श्री. नाईक यांनी दिली.

''दिलेल्या आश्वासनांची कार्यवाही कालबद्ध स्वरुपात करुन कुष्ठपीडितांना आता तरी न्याय मिळेल,'' असा विश्वास श्री. राम नाईक यांनी पत्रकाच्या शेवटी व्यक्त केला आहे.

**(कार्यालय सचिव)**